**<u>सं. फौ. खटला क्र.११६/२०१७</u>**

**<u>निशाणी क्र.९२</u>**

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०५ चा पुरावा ::</u>**

**<u>शपथेवर सत्य निवेदन करतो की,</u>**

**<u>माझे नांव</u>** : लक्ष्मण विठ्ठलराव नागरगोजे,

**<u>वय</u>** : ४४ वर्षे, **<u>काम</u>** : पोलीस हवालदार/८४१,

पोलीस ठाणे जळकोट ता. जळकोट जि. लातूर.

**:: <u>अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत</u> ::**

मी वर्ष २०१५ ते २०२२ या कालावधीत पोलीस ठाणे देवणी येथे कार्यरत होतो. दि.२७/०१/२०१७ रोजी मला गुन्ह्याचा तपास मिळाला होता व त्यासोबत फिर्याद, एम.एल.सी. चे कागदपत्रे होती. त्यावेळी पोलीस ठाणे अंमलदार श्री. बनसोडे होते. त्यानंतर मी घटनास्थळी पंचनामा तयार केला. आता मला पंचनामा (नि.८७) दाखविला. हा तोच आहे. त्यावर माझी सही आणि पंचांच्या सह्या आहेत. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. मी साक्षीदारांचे तपास टिपण नोंदवले. मी वैद्यकीय अधिकाऱ्याकडून दुखापतीचे प्रमाणपत्र प्राप्त केले. मी आरोपीला नोटीस दिली आणि सोडले. आरोपीने निष्काळजीपणे व हयगयीपणे वाहन चालवून फिर्यादीला मागून धडक दिली व गंभीर जखमी केले, असे तपासात निष्पन्न झाल्याने मी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

सरतपास पूर्ण.

**:: <u>आरोपीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. यु.एस. बिराजदार यांच्यामार्फत</u> ::**

०२. हे म्हणणे खरे आहे की, दशरथ माने, नामदेव माने, ग्यानोबा माने हे फिर्यादीचे मुले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सुकुमार दशरथ माने ही फिर्यादीची सून आहे. हे म्हणणे खरे आहे की, रामेश्वर तुकाराम माने व लक्ष्मीकांत तुकाराम माने हे फिर्यादीच्या भावाची मुले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ कोनाळी ते देवणी या रोडवर आहे. सदर रस्त्याने खाजगी वाहने व बसेसची वरदळ असते. मी उपरोक्त नमूद लोकांव्यतिरीक्त ईतरांचे तपास टिपण नोंदवले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मीकांत तुकाराम माने हा पंचनाम्याकरिता हजर नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी लक्ष्मीकांतच्या

गैरहजेरीमध्ये पोलीस स्टेशनमध्ये पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने अपघात केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा पंचनामा केला आणि खोटे दोषारोपपत्र दाखल केले.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत                सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

दि.२४/०३/२०२६.